दैनिक आनंदनगरी

# बालविवाह रोखण्यासाठी समाजाने आपली मानसिकता बदलणे गरजेचे-रुपाली चाकणकर

## 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमातंर्गत जनसुनावणी संपन्न

जालना - बालविवाह रोखण्यासाठी कठोर कायदे तयार करण्यात आले आहेत. मात्र तरीही बालविवाह होत आहेत. ही खरोखर शोकांतिका आहे. समाजाने यासाठी जागरुक होणे आवश्यक असून मुलींचे उज्वल भविष्य आणि निरोगी आरोग्याकरीता समाजाने आपली मानसिकता बदलणे गरजेचे आहे. विशेषत: पालकांनीच बालविवाहासाठी पुढाकार घेऊ नये, असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात आज महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमातंर्गत जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर महिला आयोगाच्या सदस्या संगीता चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अक्षय शिंदे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती आर.एन. चिमिंद्रे आदींसह विविध विभागांचे अधिकारी आदींसह संरक्षण अधिकारी, पॅनलचे सदस्य, तक्रारदार महिला व नातेवाईक उपस्थित होते.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या की, शहरी व ग्रामीण तसेच दुर्गम भागातील महिलांना मुंबई येथील महिला आयोगाच्या कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणांमुळे शक्य होत नसल्यामुळे महिला आयोग आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आतापर्यंत वीसपेक्षा जास्त जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्यात आला आहे. जागेवर महिलांच्या तक्रारी सोडवण्याचा प्रयत्न या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात येतो. महिलांच्या अनेक तक्रारी असतात. कुटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार, बालविवाह, हुंडयासाठी छळ, अशा अनेक समस्या सुनावणीतून समोर येत आहेत. बालविवाह सारख्या अनिष्ट समस्येला खरंतर आई-वडिलच जबाबदार असतात. वयाच्या १८ वर्षापूर्वी मुलीचे लग्न करु नये, कारण ती शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम झालेली नसते. तिच्या लग्नासाठी हुंडाही दिला जातो. हुंडा देणे कायद्याने गुन्हा आहे. हुंडयाचा हाच पैसा मुलीच्या शिक्षणासाठी उपयोगात आणल्यास मुलगी खऱ्या अर्थाने स्वावलंबी होईल. तसेच मुलींवर अत्याचारही होणार नाहीत. बालविवाह होऊ नये यासाठी समाजाने मानसिकता बदलणे खूप गरजेचे आहे. महिला आयोग तुमच्यासाठीच आहे. पिडीतांना न्याय देण्याची आयोगाची भूमिका आहे. यासाठीच महिला आयोग आपल्या दारी हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.



जिल्हा अधीक्षक डॉ. अक्षय शिंदे यांनी मुली व महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्यावतीने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांनीही मनोगत व्यक्त केले.

यानंतर महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या उपस्थितीमध्ये जनसुनावणी घेण्यात आली. आयोगाच्या सदस्यांचा समावेश असलेल्या तीन पॅनलने उपस्थित महिलांच्या समस्या व त्यांच्या तक्रारी ऐकुन घेतल्या. पॅनलमध्ये संरक्षण अधिकारी, वकील व समुपदेशन अधिकारीही होते. एकूण १२६ तक्रारी जनसुनावणीत प्राप्त झाल्या. सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत निवारण तक्रार समिती असणे आवश्यक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली विभागप्रमुखांची आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीत त्यांनी कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत निवारण तक्रार समिती असणे आवश्यक आहे. सर्व आस्थापनांची तपासणी करण्यात येऊन प्रत्येक ठिकाणी अशा प्रकारची समिती स्थापन झालेली आहे का याची खातरजमा करण्यात यावी. महिलांनी केलेल्या तक्रारींवर या समितीमार्फत तातडीने कार्यवाही होईल, यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सुचना त्यांनी केल्या. अवैध गर्भपात रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. खाजगी रुग्णालयांना अचानक भेट देऊन तपासणी करावी. येत्या पंधरा दिवसांत केलेल्या कार्यवाईचा अहवाल आयोगास सादर करण्यात यावा. बालविवाहाच्या तक्रारी, ऊसतोड कामगार महिलांची प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी. यावेळी मिशन वात्सल्य योजना, मनोधैर्य योजना, माझी कन्या भाग्यश्री, गृह स्वाधार योजना, शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत योजना, विशाखा समिती, महिलांसाठी शासकीय वसतीगृहे यासह जिल्हा कामगार अधिकारी, पोलीस विभाग, समाजकल्याण, महिला व बालकल्याण, महिला आर्थिक विकास महामंडळ, कौशल्य विकास, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाशी संबंधित महिलांच्या योजना व उपक्रमांचा सविस्तर आढावाही श्रीमती चाकणकर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांकडून घेतला.

बैठकीस सदस्या संगीता चव्हाण, अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, अपर पोलीस अधीक्षक राहूल खाडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती पी. पी. बारस्कर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती आर.एन. चिमिंद्रे, जिल्हा महिला आयोगाचे जिल्हा समन्वयक ड. पी. जे. गवारे, ड. अश्विनी धन्नावत आदींसह विभागप्रमुख उपस्थित होते.

Scanned by TapScanner

## रूपाली चाकणकर : पंधरा दिवसांत सुधारणा केली तर ठीक, अन्यथा कारवाई

# जालन्याच्या कारभारावर असमाधानी

▸ सकाळ वृत्तसेवा

**जालना, ता. २ : महिला सुरक्षेसंदर्भात जिल्हा प्रशासनासह इतर विभागाने अहवाल सादर केला आहे. मात्र, हा अहवाल महिला आयोगाच्या गोपनीय अहवालापेक्षा वेगळा असून सर्व कामे कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जालन्याच्या कारभारावर राज्य महिला आयोग समाधानी नाही. येत्या पंधरा दिवसांत या सर्व बाबींत सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. सुधारणा झाली नाही, तर महिला आयोग आपल्या पद्धतीने कारवाई करेन, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी गुरुवारी (ता.दोन) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, अपर पोलिस अधीक्षक राहुल खाडे यांच्यासह इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.**

दहापेक्षा अधिक व्यक्ती काम करत असलेल्या जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये महिलांच्या अडचणी सोडविण्यासाठी महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, ही समिती जालन्यात प्रत्यक्षात काम करताना दिसत नाही. ही समिती केवळ कागदावर असल्याचे दिसून आले आहे, असे श्रीमती चाकणकर यांनी यावेळी म्हटले.

अवैध गर्भपात रोखण्यासाठी छापासत्र सुरू करा जिल्ह्यात अवैध गर्भपात होत असताना जिल्ह्याचा राज्य महिला आयोगासमोर आलेला अहवाल हा समाधानकारक नाही. त्यामुळे शुक्रवारपासून (ता.तीन) जिल्ह्यातील अवैध सोनोग्राफी सेंटरवर छापासत्र सुरू करण्याचे निर्देश दिले आहे. या कारवाईवर राज्य महिला आयोगाचे सदस्य लक्ष ठेवून असतील असे ही श्रीमती चाकणकर यांनी सांगितले.



जालना : पत्रकार परिषदेत बोलताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर. यावेळी उपस्थित अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, अपर पोलिस अधीक्षक राहुल खाडे.

### बालविवाह रोखा

■ जिल्ह्यात २०२२ व २०२३ या कालावधीमध्ये ७० बालविवाह रोखल्याचा अहवाल सादर केला आहे. मात्र, राज्य महिला आयोगाच्या गोपनीय अहवालानुसार जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बालविवाह होत आहेत. त्यामुळे यापुढे बालविवाह झाले तर सरपंच, ग्रामसेवकांवरही दोषारोपपत्र दाखल करा. त्यांच्यावर दोष सिद्ध झाल्यास सरपंच आणि ग्रामसेवक यांना पदमुक्त करावे, अशी शिफारस राज्य शासनाकडे केल्याचे सांगत श्रीमती चाकणकर म्हणाल्या, की नागरिकांनीही बालविवाहाची माहिती राज्य महिला आयोगाला द्यावा, ही माहिती खरी ठरल्यास माहिती देणाऱ्याला बक्षीसही दिले जाईल.

### शाळा, महाविद्यालयांकडे गस्त वाढवा

■ शाळा, महाविद्यालय भरण्यासह दुपारी जेवणाच्या वेळी व शाळा सुटण्याच्या वेळी दामिनी पथकासह पोलिसांनी गस्त करावी, अशा सूचना दिल्या आहेत. शिवाय जिल्ह्यात नव्याने दामिनी पथक स्थापन करून पुरेसे मनुष्यबळ देण्याचे निर्देश दिले आहे, असे श्रीमती चाकणकर यांनी सांगितले.

### शाळा, महाविद्यालयात मुलांसाठी स्वच्छतागृहे

■ प्रत्येक शाळा, महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी स्वच्छ असे स्वतंत्र स्वच्छतागृह, मासिक पाळीच्या वेळी विद्यार्थिनी सॅनिटायझर पॅड उपलब्ध होणे गरजेचे आहे. या सर्व सुविधा तत्काळ उपलब्ध करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहे, असे श्रीमती चाकणकर यांनी सांगितले.

### तक्रारींचा पाऊस

■ राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यासमोर जिल्ह्यातील तब्बल ११४ महिलांनी तक्रारी केल्या. यात कौटुंबिक हिंसाचाराच्या ७५, हुंड्याच्या नऊ, सामाजिक नऊ, कामाच्या ठिकाणी छळाच्या नऊ व इतर १७ तक्रारी दाखल झाल्या. दरम्यान अधिकाऱ्यांच्या बैठकीसाठी श्रीमती चाकणकर गेल्यानंतर महिला तक्रारीचा ओघ सुरूच होता.

Scanned by TapScanner

महाराष्ट्र शासन

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# जिल्हा माहिती कार्यालय, जालना

**प्रशासकीय इमारत, तळ मजला, जालना-431203**

---

**वृत्तपत्राचे नाव :दैनिक दिव्य मराठी** **दिनांक : 3 मार्च 2023**

धक्कादायक • राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकरांसमोर १५० हून अधिक महिलांनी मांडली कैफियत

## राज्यातील २२ जिल्ह्यांत जनसुनावणी, सर्वाधिक महिलांच्या तक्रारी जालन्यात

जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा महिलांचे प्रश्न सोडवण्यात कमी पडली

१५ दिवसांत या तक्रारींचे निराकरण करा, भ्रूणहत्या मोहीम राबवा

### जबाबदारी निश्चित करून राज्य सरकारला देणार अहवाल, सोनोग्राफी केंद्रांच्या तपासणीचे निर्देश

#### दुपारी २.३० वाजेपर्यंत सुरूच होती सुनावणी



#### यंत्रणांची कामे असमाधानी, सरकारला देणार अहवाल

#### बालविवाह रोखणे ही सामूहिक जबाबदारी, दोषींवर कार्यवाही होणारच

Scanned by TapScanner